**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव**
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




# -:प्रेस नोट :-

दिनांक :- ०९/०५/२०२६

## "जळगाव पोलीसांची विशेष नाकाबंदी मोहिम "
## ५ तासांच्या विशेष नाकाबंदीत ३९९ बेशिस्त वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई

जळगाव जिल्ह्यात आगामी काळातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने आणि गुन्हेगारी कारवायांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने, दिनांक ०८ मे २०२६ रोजी सायंकाळी १८:०० ते २३:०० या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात एकाच वेळी **'विशेष नाकाबंदी मोहीम'** राबविण्यात आली. सदर मोहीम **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, विशेष मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक, जळगाव व चाळीसगाव परिमंडळ, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या पथकांचा सक्रिय सहभाग होता. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ३९ पोलीस अधिकारी आणि १९२ पोलीस अंमलदार असे एकूण २३१ मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते.

सदर ५ तासांच्या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील विविध मोक्याच्या ठिकाणी नाकाबंदी करून सुमारे **२२५० संशयित वाहनांची कसून तपासणी करण्यात आली.** या मोहिमेत मोटार वाहन कायद्याच्या (MV Act) विविध तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या **एकूण ३९९ वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करत एकूण ३,५८,२५०/- (तीन लाख अठ्ठावन्न हजार दोनशे पन्नास रुपये) इतका दंड आकारण्यात आला आहे**. **तसेच, गंभीर उल्लंघन करणाऱ्या 01 वाहनावर जप्तीची कारवाई देखील करण्यात आली आहे.**

कारवाईचे सविस्तर माहिती पुढील प्रमाणे मोटार वाहन कायदा कलम १२८ अन्वये त्रि-आसन (Triple Seat) प्रवास करणाऱ्या १०६ वाहन चालकांवर, विनापरवाना वाहन चालविणाऱ्या ९४ व्यक्तींवर, आणि विना नंबर प्लेट अथवा सदोष (फॅन्सी) नंबर प्लेट असलेल्या एकूण १२२ (७८+४४) वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असलेल्या मद्यपान करून वाहन चालविणे (Drunk and Drive - Section 185 MV Act) या प्रकारातील ०८ केसेसची नोंद करण्यात आली असून, संबंधितांवर कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. **जळगाव शहर वाहतूक शाखेने ६९ केसेसमध्ये ५४,५०० रुपये, तर भुसावळ वाहतूक शाखेने १०३ केसेसमध्ये ६९,१०० रुपये दंड वसूल करून सर्वाधिक दंडात्मक कारवाईची नोंद केली आहे.**

आगामी काळातही जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अशा प्रकारच्या अचानक नाकाबंदी आणि तपासणी मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**
**सर्व प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक प्रिंटमिडीया**
**2/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*************************************************************************************